सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.
श्री. संजय महादु मते ग्रामसेवक, ग्रामपंचायत- पुणेवाडी/ हत्तलखिंडी पंचायत समिती पारनेर येथील गैरवर्तनाबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ 293 /२०२४
अहमदनगर, दिनांक - 03/ 05 /२०२४

संदर्भ :- १.कार्यालयीन आदेश साप्रवि-२/ग्रापं-३/७१४/२०२२, दिनांक- ०१/११/२०२२
(सेवानिलंबन आदेश)
२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र /ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१३४/२०२४, दिनांक- ०६/०३/२०२३
३. श्री.संजय महादु मते ग्रामसेवक यांचा खुलासा २१/०३/२०२४
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)
५. या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/27/२०२४, दि 3/05/२०२४
(चौकशी अधिकारी नियुक्ती आदेश)

ज्या आर्थी, श्री. संजय महादु मते ग्रामसेवक, ग्रामपंचायत- पुणेवाडी/ हत्तलखिंडी पंचायत समिती पारनेर येथे कार्यरत असताना गट विकास अधिकारी यांना शिवीगाळ,दमदाटी करणे,अतिक्रमण नोंदवही न ठेवणे, घरपटटी पाणी पटटी वसुलीचे प्रमाण कमी असणे व अन्य प्रकारचे ग्रामपंचायत कामकाजात गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.०२ अन्वये, दोषारोप ठेवणेत आले होते. सदरचे दोषारोप दिनांक १२/०३/२०२४ रोजी श्री. संजय महादु मते ग्रामसेवक ग्रामसेवक, यांना समक्ष बजावले असून त्यांनी संदर्भ क्रमांक ०३ अन्वये खुलासा सादर केलेला आहे.त्यांचे गैरवर्तनाचे १ ते ०८ दोषारोप तयार करण्यात आलेले आहेत. श्री.मते यांनी सर्व १ ते ८ आरोप खुलाश्यामधे नाकबुल केलले आहेत. सबब, त्यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तसेच सदरच्या चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (५) अन्वये, मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हा परिषदेची बाजू मांडण्याकरीता सादरकर्ता अधिकारी म्हणून श्री.जगताप संजय सर्जेराव, विस्तार अधिकारी,(पंचायत ) पंचायत समिती पारनेर यांची नेमणूक करणेत येत आहे.सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर राहणे बंधकारक आहे. त्याप्रमाणे संदर्भ क्र. २ व ३ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे याचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजू मांडावी. परिशिष्ठ क्र. तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रासह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. वरील कामी दिरंगाई अथवा टाळाटाळ झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 20240503060070 असा आहे.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री.जगताप संजय सर्जेराव, सादरकर्ता अधिकारी विस्तार अधिकारी,(पंचायत )

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

२/- सदर आदेशाची एक प्रत संबंधितांस बजावून दुस-या प्रतीवर स्वाक्षरी घेवून पोहच या कार्यालयास पाठविण्यात यावी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

प्रत :- श्री. संजय महादु मते सेवा निलंबीत ग्रामसेवक,मुख्यालय शेवगाव

व्दारा :-गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव

प्रत :- सहा. आयुक्त, (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

प्रत :- निवड नस्ती.

या

Scanned with OKEN Scanner